# निवेदन

नाशिक जिल्ह्यातील उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील ६ वी ते ८ वी गटातील एका व ९ वी ते १० वी च्या गटातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांनी या योजने अंतर्गत बनविलेल्या विज्ञान प्रकल्प / प्रतिकृतींचे जिल्हास्तरीय प्रदर्शने खालील प्रमाणे आयोजीत करण्यात आलेली आहेत.

नेमी नगर, चांदवड येथे बागलाण, चांदवड, देवळा या तालुक्यातील व नांदगाव तालुक्यातील (फक्त प्राथ. शाळा) / ए.टी.टी. हायस्कूल मालेगाव येथे मालेगाव तालुक्यातील / पिंपळगाव हायस्कूल, पिंपळगाव (ब.) येथे येवला, निफाड या तालुक्यातील व नांदगाव तालुक्यातील (फक्त माध्य. शाळा) / मराठा हायस्कूल, नाशिक येथे नाशिक तालुक्यातील. आर. के. एम. विद्यालय, कळवण येथे कळवण, सुरगाणा व दिंडोरी या तालुक्यातील शाळांमधील अवार्डी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विज्ञान प्रतीकृती / प्रकल्पांचे दिनांक १२ जूलै ते १४ जूलै २०११ आणि मराठा हायस्कूल, नाशिक येथे पुन्हा सिन्नर, ईगतपूरी, त्र्यंबकेश्वर व पेठ या तालुक्यातील शाळांमधील अवार्डी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विज्ञान प्रतीकृती / प्रकल्पांचे दिनांक १६ जूलै ते १८ जूलै २०११ या कालावधीत प्रदर्शने आयोजीत करण्यात आलेली आहेत.

नाशिक जिल्ह्यातील सर्व संबंधीत शाळांच्या मुख्याध्यापकांनी आपआपल्या तालुक्यांच्या गटशिक्षणाधिकरी यांचेकडून नियोजन जाणून घेऊन, विद्यार्थ्यांना प्रदर्शन स्थळी सहभाग घेण्यासाठी पाठवावे. इयत्ता १० वीचे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष संपल्याने दाखला घेऊन गेलेले असले तरी त्यांना प्रदर्शनात उपस्थित राहाण्याबाबत मार्गदर्शन करावे व त्यांना जिल्हास्तर प्रदर्शनास उपस्थित ठेवावे.

सहीxxxx
(बी. के. दहिफळे)
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, नाशिक

**नियंत्रक अधिकारी तथा - मा. मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक**

**INSPIRE AWARD योजना २०१०-११**

# - द्वितीय जाहीर निविदा सूचना -

विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली व राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर यांचे निर्देशानुसार नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील INSPIRE AWARD योजना २०१०-२०११ या वर्षासाठी निवड झालेल्या अवार्डी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विज्ञान प्रकल्प / वैज्ञानिक प्रतिकृतींचे दिनांक १२ जूलै २०११ ते १८ जूलै २०११ या कालावधीत तीन - तीन दिवसांची ६ जिल्हास्तरीय प्रदर्शने **मालेगाव, चांदवड, पिंपळगाव (ब.), नाशिक व कळवण** या पाच ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहेत.

जिल्हास्तरीय प्रदर्शनाचे ठिकाणी खालीलप्रमाणे उर्वरित सुविधांची आवश्यकता आहे. अनुभवी पुरवठादारांकडून अल्प मुदतीत जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत. प्रदर्शनाच्या प्रत्येक ठिकाणच्या तीन दिवसांच्या प्रत्येक सत्रात अंदाजे किमान ८०० ते कमाल १००० व्यक्तींचा सहभाग अपेक्षित आहे.

**आवश्यक असणाऱ्या सुविधांचा तपशील खालील प्रमाणे**

| अ.क्र. | सुविधा / व्यवस्था |
|---|---|
| १ | **समारंभ उद्घाटन व समारोप इ. साठी** - मंडप, प्रवेशद्वार, विद्युत रोषनाई, ध्वनी व्यवस्था, सी.सी.टी.व्ही., आसन व्यवस्था. |
| २ | प्रदर्शन दालन निर्मिती, मांडणी / रचना - ६' X ३' मापाचे टेबल, त्यावर सफेद चादर प्रदर्शनाच्या एका खोलीत टेबलजवळ तात्पूरत्या विद्यूत पुरवठयासाठी एक्स्टेन्शन बॉक्स. |
| ३ | प्रदर्शन पारितोषिक - शासनाने / NCERT / NBT या प्रकाशनांनी प्रकाशित केलेली प्रगत व उपयुक्त विज्ञान पुस्तकांचे २४८ संच (एका संचाची अंदाजे एकूण किमंत ८०० रू. ते १०००/ रू.) पुरवठा करणे व पारितोषिक प्रमाणपत्र आणि सहभाग प्रमाणपत्र छापणे. |

**अटी -**

१. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे.

२. छापील निविदा फॉर्म - ही निविदा प्रसिध्द झाल्यापासून **दिनांक २/०७/२०११ अखेर** कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते ५.४५ या कार्यालयीन वेळेत शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. नाशिक यांच्या कार्यालयात निविदा फॉर्मची किंमत रुपये १००/- रोख भरुन मिळू शकतील. त्यानंतर निविदा फॉर्म मिळणार नाहीत.

३. जिल्हास्तर प्रदर्शन आयोजित केलेल्या तालुक्यातील स्थानिक पुरवठादारांकडूनही निविदा सादर होणे अपेक्षित असल्यामुळे सदरचे निविदा फॉर्म गटशिक्षणाधिकारी मालेगांव, चांदवड, निफाड व कळवण यांच्या कार्यालयात देखील वरीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

४. मालेगांव, चांदवड, कळवण व पिंपळगांव (ब.) येथील प्रदर्शनांसाठी वरील अ. क्र. १ व २ या कामासाठीच्या निविदा फॉर्म केवळ पंचायत समिती, मालेगांव, चांदवड, कळवण व निफाड यांच्या कार्यातलयात निविदा फॉर्म दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद पाकीटाद्वारे **दिनांक ३/०७/२०११ रोजी** सायं. ५ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.

५. सर्व ठिकाणच्या प्रदर्शनासाठी वरील अ. क्र. ३ च्या कामाच्या निविदा विक्रीची व स्वीकारण्याची सोय / सुविधा केवळ शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. नाशिक यांच्याच कार्यालयात राहील. निविदा फॉर्म दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद पाकीटाद्वारे **दिनांक ३/०७/२०११ रोजी** सायं. ५ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.

६. इतर अटी व शर्ती त्या त्या निविदा फॉर्म प्रमाणे लागू राहातील.

७. **दिनांक ३/०७/२०११ रोजी रविवारची सार्वजनिक सुट्टी असली तरी वरील सर्व कार्यालये दिनांक ०३/०७/२०११ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत सुरु राहातील.**

८. त्यानंतर टपालाने अथवा समक्ष उशिराने प्राप्त होणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

सहीXXXX

**अध्यक्ष / नियंत्रक अधिकारी,**
**तथा - मा. मुख्यकार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नाशिक (करीता)**